महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
आदेश क्रमांक:एनजीसी२००७/ (१८९ /०७)/ मशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २ जुलै, २००७

पहावे : १) अध्यक्ष, टास्क फोर्स तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा प्रस्ताव क्र.एनजीसी/०७-०८/नवि महा. अनु/ मान्यता/मवि-२-३, दि.२८मार्च, २००७
२) अध्यक्ष, टास्क फोर्स तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा प्रस्ताव क्र.अमवि/नविन महा.मान्यता/२००७-०८/एसएनडीटी/ मवि-२/३६१३, दि.३० मे, २००७

## आदेश

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२ (४) नुसार राज्यातील विद्यापीठांकडून नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव शासनाकडे परवानगीसाठी प्राप्त झाले आहेत. विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची शासनाने कार्यबलगटाद्वारे तपासणी करुन घेतली आहे. विद्यापीठाच्या व समितीच्या शिफारशी विचारात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२ (५) अन्वये प्राप्त अधिकारानुसार खालील नवीन महाविद्यालयांना सन २००७-०८ या शैक्षणिक-वर्षापासून परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीवर **कायम विना अनुदान तत्वावर** शासनाची परवानगी देण्यात येत आहे:-

### (अ)नवीन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

| अ.क्र | संस्थेचे नाव व पत्ता | विद्याशाखा/ नियोजित ठिकाण |
|---|---|---|
| | **मुंबई विद्यापीठ** | |
| १ | माणगांव पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, माणगांव, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग ४१६५१९ | कला शाखा, माणगांव, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग |
| २ | गुरूवर्य बी.एस. नाईक मेमोरियल ट्रस्ट, द्वारा आर ए डी हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग | आर्ट आणि कॉमर्स सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग |
| ३ | माऊली प्रतिष्ठाण, आय-४/२१, स्पगती, सेक्टर-१५, खारघर, नवी मुंबई | सायन्स, कामोठे, पनवेल. नवी मुंबई. |
| ४ | मत्सोदरी शिक्षण संस्था, सिरसवाडी नाका, रेल्वे ओव्हर ब्रीज जवळ, सर्वे नं. ४८८/२९, जालना ४३१२०३ | वाणिज्य सानपाडा, नवी मुंबई. |
| ५ | ज्ञान विकास संस्था, प्लॉट नं. २३/२४, सेक्टर १७, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९ | वाणिज्य कोपरखैरणे, नवी मुंबई |
| ६. | नालंदा एज्युकेशनल फाऊंडेशन, मालेकर वाडी, पी.एल.लोखंडे मार्ग, चेंबूर, मुंबई ४०००८९ | कला, वाणिज्य, विज्ञान चेंबूर, मुंबई ८९ |
| ७. | शिक्षण प्रसारक मंडळ, नेरुळ, सेक्टर-४, फेज-२, नेरुळ, नवी मुंबई ४००७०६ | कला, वाणिज्य व विज्ञान नेरुळ, नवी मुंबई |
| ८. | निर्मल एज्यूकेशन सोसायटी, सी.टी.एस. नं. ६३८/ई, व्हिलेज पायनूर, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पू), मुंबई ४००१०३ | वाणिज्य कांदिवली (पूर्व) मुंबई ६७ |
| ९. | गायत्री शिक्षण प्रसारक मंडळ. मिलाप नगर, एम.आय.डी.सी. डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे | विज्ञान कोपर, डोंबिवली (प), जि.ठाणे |



I/c Principal
Vasant Kale College of Computational and Management Sciences, Vishnupuri

PRINCIPAL
Vasant Kale College of Computational Management Sciences, Vishnupuri
NANDED-431606

| | | |
|---|---|---|
| २४ | कै.अण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्था, चांदेगाव, ता.जि.बीड | बी.एससी.संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान चौसाळा, जि.बीड |
| २५ | राजकुंवर बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, द्वारा केंब्रिज इंग्रजी शाळा नवीन सिव्हील दवाखाना, जूना जालना | बी.बी.ए., बी.सी.ए. जालना |
| २६ | वसंतराव नाईक शिक्षण संस्था, रामनगर तांडा माडेखेल, ता.परळी, जि.बीड | बी.सी.ए. परळी वैजनाथ |

**संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती**

| | | |
|---|---|---|
| २७ | श्रीदत्त लखमाजी शिक्षण प्रसारक मंडळ, महालक्ष्मी कॉलनी शंकरनगर जवळ, अमरावती. | गृह विज्ञान (बी.एससी.) चांदूरबाजार, जि.अमरावती |
| २८ | ज्ञानसागर शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, वरुड, द्वारा श्री नरेशचंद्रजी प.ठाकरे, जवाहर कॉलनी, वरुड, जि.अमरावती | बी.बी.ए., डी.टॅक्स. वरुड, ता.वरुड, जि.अमरावती |
| २९ | ज्योती शिक्षण प्रसारक मंडळ, जि.अकोला, विजय हौसिंग सोसायटी, गोरक्षण मार्ग, अकोला | बी.सी.ए. कपीलवस्तूनगर, अकोला |
| ३० | मातोश्री एज्युकेशन सोसायटी मेहेकर, ता. मेहेकर, जि. बुलढाणा | बी.सी.ए. मेहेकर, जि. बुलढाणा |
| ३१ | श्री. लक्ष्मी नारायण शैक्षणिक बहुउदेशिय ग्राम विकास संस्था, ता. खामगाव, जि. बुलढाणा | बी. बी. ए. खामगाव, जि. बुलढाणा |

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

| | | |
|---|---|---|
| ३२ | जवाहरलाल शिक्षण प्रसारक मंडळ, नाथनगर, नांदेड | बी.सी.ए. नांदेड ** |
| ३३ | विश्वदीप सेवाभावी संस्था, अन्नपूर्णा निवास, सुनार गल्ली मोठा मारुती जवळ,ता.जि. परभणी | बी.सी.ए. परभणी |
| ३४ | शरद प्रतिभा प्रतिष्ठान, प्रियदर्शनी, कैलासनगर, नांदेड | बी.सी.ए., बी.एससी. (सी.एस.), बी.बी.ए. हिंगोली |
| ३५ | सहयोग सेवाभावी संस्था, विष्णूपूरी , नांदेड | बी.एससी. (सी.एस.), बी.सी.ए. विष्णूपूरी, नांदेड |
| ३६ | गाडगेबाबा ग्रामीण विकास प्रतिष्ठान, मु.पो. कंधार, जि.नांदेड ४३१७१४ | बी.एससी. (सी.एस.) तरोडा, जि.नांदेड |
| ३७ | महात्मा फुले ग्रामीण विकास सेवाभावी संस्था, सोनवडा ता.जळकोट, जि.लातूर | बी.सी.ए. परभणी ** |
| ३८ | तन्मय बहुउद्देशिय संस्था, एम आय डी सी रोड, अश्वमेघ हॉटेलच्या मागे, श्रीनगर, लातूर | बी.एससी. (सी.एस.), बी.सी.ए. लातूर ** |
| ३९ | राष्ट्रीय कॉम्प्युटर प्रशिक्षण संस्था, राजेंद्र गिरी नगर, वसमतरोड, परभणी | बी.सी.ए. हिंगोली |
| ४० | मयुर बहुउदेशिय सेवाभावी शिक्षण संस्था, साईचेंबर्स, आनंद नगर, नांदेड ४३१ ६०२ | बी. एससी. (सी एस) बी. बी. ए. नांदेड |

** अशी खूण असलेल्या महाविद्यालयास विद्यापीठाची नकारात्मक शिफारस असली तरी सदरच्या अभ्यासक्रमाची स्थानिक विद्यार्थ्यांसाठी आवश्यकता विचारात घेवून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ८२(५) च्या परंतुकान्वये प्राप्त अधिकारान्वये परवानगी देण्यात आली आहे.

Principal
Vasant Kale College of Computational and Management Sciences, Vishnupuri

| | | |
|---|---|---|
| | **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.** | |
| ४१ | कै.राधिकाबाई मेघे महिला शिक्षण संस्था, अत्रे ले आऊट, नागपूर २२ | होमसायन्स (१)बॅचलर ऑफ अप्लाइड इलेक्ट्रॉनिक्स, (२) बॅचलर ऑफ कॉस्मेटीक्स अत्रे ले आऊट, नागपूर २२ |

३. अटी व शर्ती :

(१) ज्या संस्थांना नवीन महाविद्यालय मंजूर करण्यात आले आहे, त्या संस्थांनी ते भविष्यात कोणत्याही अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, यांचेकडे सादर करावे,

(२) संबंधित विभागीय सहसंचालकांचे वरील अ.क्र. १ मध्ये नमूद केलेले हमीपत्र सादर केल्याविषयीचे पत्र प्राप्त झाल्याशिवाय विद्यापीठांनी संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये,

(३) महाविद्यालयांनी कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत,

(४) विद्यापीठाने विहित केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग महाविद्यालयाने नेमणे आवश्यक असून इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात,

(५) विधी महाविद्यालयास संस्थेने बार कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता प्राप्त करुन घ्यावी. बार कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता तसेच विद्यापीठाचे संलग्निकरण मिळाल्याशिवाय महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश देऊ नयेत.

(६) ही मान्यता, फक्त शैक्षणिक वर्ष २००७-०८ पूरती मर्यादित आहे. यावर्षी नवीन अभ्यासक्रम सुरु न करणा-या महाविद्यालयांची नवीन अभ्यासक्रमांची ही मान्यता आपोआप रद्द झाली असे समजण्यात येईल

४. विद्यापीठाचे संलग्नीकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही करण्यापूर्वी विद्यापीठांनी शासनाच्या मान्यतेबाबतचे आदेश शासनाच्या संकेतस्थळावर अवलोकन करुन परवानगी बाबत खात्री करुन घ्यावी. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना पाठवावा.

५. हे आदेश, राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००७०७०२१११२७५९००१आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(बि.वा.सुतार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

(१) कुलसचिव, सर्व विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य,
(२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
(४) सर्व संबंधीत संस्था (यादीप्रमाणे), (सहसंचालक उच्च शिक्षण यांचे मार्फत)
(५) निवड नस्ती मशि-३

C:\Documents and Settings\...\My Documents\...

Principal
Vasant Kale College of Computational and Management Sciences, Vishnupuri
Nanded - 431 606.

PRINCIPAL
Vasant Kale College of Computational & Management Sciences, Vishnupuri
NANDED-431606